महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा

# {इयत्ता १० वी}

## खाजगी विद्यार्थी
## थेट अर्ज योजना

## खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७)
## माहिती व मार्गदर्शक सूचना

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी)
# खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नाव नोंदणी थेट अर्ज योजना

प्रस्तावना :-

प्रतिकूल परिस्थितीमुळे नियमित शाळेतून इ.१०वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करू न शकणाऱ्या मुला–मुलींची संख्या राज्यात लक्षणीय आहे. काही मुले–मुली प्राथमिक स्तरावर तर काही उच्च प्राथमिक स्तरावर शाळा सोडून जातात. शिक्षणाची तीव्र इच्छा असूनदेखील आर्थिक, सामाजिक व अन्य संयुक्तीक कारणामुळे ही मुले–मुली माध्यमिक शिक्षणाचा टप्पा पूर्ण करू शकत नाही. अर्धवट शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण तुलेनेने बरेच जास्त असते. परिसरात माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसणे, हलाखीची आर्थिक परिस्थिती, त्यामुळे करावी लागणारी मोलमजुरी, पालकांचे स्थलांतर व सामाजिक रूढीची बंधने या सर्वसाधारण कारणामुळे बरेच मुले–मुली शिक्षणापासून वंचित राहतात, परिणामतः त्यांची शारीरिक, मानसिक व बौध्दिक वाढ अपेक्षेप्रमाणे होत नाही.

शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इ.५वी उत्तीर्ण असलेल्या मुला–मुलींना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसून शिक्षणाच्या प्रवाहात परत येण्याची संधी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने उपलब्ध करून देऊन एक महत्वपूर्ण पाऊल उचललेले आहे.

काही कारणामुळे शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सदरची खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ही योजना मंडळाने सुरू केली आहे.

त्यानुसार खाजगीरित्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसंबंधी योजना ही सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने फेब्रु–मार्च २०२४ परीक्षेपासून खाजगी विद्यार्थी फॉर्म सर्व शाळांमधून स्विकारण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

मंडळ नियमावलीच्या नियम क्र. ४२ नुसार, नियमित शाळेत जाऊन आपले शिक्षण पूर्ण करू न शकणाऱ्या अथवा शिक्षण मध्येच सोडलेल्या विद्यार्थ्यांना मान्यता प्राप्त शाळेमार्फत मंडळाचा अर्ज क्र. १७ भरून खाजगी विद्यार्थी म्हणून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस (इ.१०वी) प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच **महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १०वी साठी खाजगी विद्यार्थी (१७ नं.) म्हणून नावनोंदणी करता येईल.**

**अ) या योजनेची ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे–**

१. किमान इयत्ता ५ वी ची परीक्षा मान्यताप्राप्त शाळेतून उत्तीर्ण झालेल्या व दिनांक ३१ जुलै रोजी किमान वयाची १४ वर्षे पूर्ण करणारी कोणतीही व्यक्ती खाजगी विद्यार्थी म्हणून नाव नोंदणी करण्यास पात्र राहील.

२. नियमितपणे शाळेत जाऊन परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणेच, विषय योजना असलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसण्याची संधी, त्यामुळे परीक्षेच्या दर्जामध्ये व पद्धतीमध्ये बदल नाही.

३. स्वाध्यायपुस्तिका ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या संकेतस्थळावर सरावासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू माध्यमात उपलब्ध होतील. याबाबत संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / विषय शिक्षकांकडून सूचना व मार्गदर्शन मिळेल.

४. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांचा सराव व त्याद्वारे प्रात्यक्षिकाची तयारी नावनोंदणी केलेल्या शाळांमार्फत करण्यात येईल.

५. नियमित विद्यार्थ्यांसाठी असणाराच अभ्यासक्रम खाजगी विद्यार्थ्यांसाठी राहणार असून परीक्षा संचालन व परीक्षोत्तर बाबींसाठी इतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व नियम व कार्यपद्धती खाजगी विद्यार्थ्यांना लागू राहतील.

६. तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी विषयांची तयारी व परीक्षा यांची व्यवस्था संबंधित शाळेमार्फत करण्यात येईल.

**ब) नावनोंदणी पात्रतेसाठी आवश्यक अटी**

| परराज्यातील / परदेशातील विद्यार्थी | महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी |
|---|---|
| १) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यास खाजगी विद्यार्थी म्हणून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसण्याची विद्यार्थ्यांची इच्छा असेल त्या परीक्षेच्या प्रारंभाच्या तारखेच्या आधी तो किमान दोन वर्षे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक असेल.<br>२) भारताचा नागरिक असलेला एखादा उमेदवार, परदेशातील माध्यमिक शाळेचा नियमित विद्यार्थी असेल आणि त्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस समतुल्य म्हणजे (सिनियर केंब्रिज वा तत्सम अन्य) परीक्षेचा अभ्यासक्रम पूर्ण केला असेल तर त्याला खाजगी उमेदवार म्हणून परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगीसाठी नावनोंदणी करता येईल, परंतु अशा उमेदवारास सक्षम प्राधिकाऱ्यांचा रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक असेल .<br>३) परराज्यातील विद्यार्थी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेमध्ये किमान ५ वी इयत्ता उत्तीर्ण झालेला असावा व त्याकरिता त्याने आवश्यक तो पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला) सादर करावा.<br>४) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांची ज्या वर्षाच्या मार्च मध्ये घेण्यात येणाऱ्या इ. १० वी परीक्षेस बसण्याची इच्छा असेल तर त्याला त्या शैक्षणिक वर्षात कोणत्याही मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरीपटावर नियमित विद्यार्थी म्हणून नाव दाखल करता येणार नाही.<br>५) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने संबंधित विभागीय मंडळाकडे नाव नोंदवितांना वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असतील. त्यासाठी जन्मतारखेचा आवश्यक तो पुरावा सादर करील. | १) विद्यार्थी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेमध्ये किमान ५ वी इयत्ता उत्तीर्ण झालेला असावा व त्याकरिता त्याने आवश्यक तो पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला) सादर करावा.<br>२) विद्यार्थ्यांची ज्या वर्षाच्या मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या इ.१० वी परीक्षेस बसण्याची इच्छा असेल तर त्याला त्या शैक्षणिक वर्षांत कोणत्याही मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरीपटावर नियमित विद्यार्थी म्हणून नाव दाखल करता येणार नाही.<br>३) संबंधित विभागीय मंडळाकडे नाव नोंदविताना विद्यार्थ्याने वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असतील. त्यासाठी जन्मतारखेचा आवश्यक तो पुरावा सादर करील.<br>**४) महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता १०वी साठी खाजगी विद्यार्थी (१७ नं.) म्हणून नावनोंदणी करता येईल.** |
| **शाळा सोडल्याच्या दाखल्यामधील दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात यावा.** | |

**क) नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या सूचना**

१ खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १० वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाइन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२ **खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी ज्या शाळेतून मंडळाची परीक्षा दयावयाची आहे, त्या शाळेत जाऊन शाळेचा सांकेतांक, विषय योजना, माध्यम व इतर आवश्यक माहिती घेऊनच नोंदणी करावी.**

३ **इ. १० वी च्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज करतांना विद्यार्थ्यांनी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरील Student Corner या option चा वापर करावा, अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.**

४ **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.**

५ विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), २) मूळ प्रत नसल्यास, द्वित्तीय प्रत व द्वितीय प्रत असल्याचे प्रतिज्ञापत्र (प्रपत्र अ किंवा ब) ३) आधार कार्ड ४) फोटो ५) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यास महाराष्ट्रातील रहिवासाबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचा रहिवासी दाखला ऑनलाईन अर्ज भरतांना आवश्यक असून सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. **काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे शाळा सोडल्याचा दुय्यम (Duplicate) दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक आहे.**

६ कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थांनी स्कॅनर / मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७ **इ. १०वी फेब्रु—मार्च २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्यास व संबंधित शाळेस त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.**

८ **एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यास प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता (Current address) माध्यम, शाळा यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.**

९ **संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर अर्जाबाबतची संपूर्ण माहिती तसेच त्याने upload केलेली सर्व मूळ कागदपत्रे त्याच्या Login मध्ये उपलब्ध राहतील. सदर अर्जाची प्रत (printout) विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या ई—मेल आयडीवर पाठविली जाणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावीत.**

१० **विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या पोचपावतीची printout व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत विहीत मुदतीत जमा करावयाची आहेत.**

११ खाजगी विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे –

**रु. १११०/- नाव नोंदणी शुल्क + रु. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)**

**रु. १०० /- विलंब शुल्क प्रति विद्यार्थी**

**रु . २० /- अतिविलंब शुल्क प्रति विद्यार्थी प्रति दिन**

१२ विद्यार्थी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस नाव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) मिळाल्यानंतर कोणत्याही कारणामुळे प्रविष्ट झाला नाही तरी त्याला शुल्क परत केले जाणार नाही. मात्र त्याने परीक्षेचे शुल्क भरले असल्यास नियमाप्रमाणे कपात करुन उर्वरित परीक्षा शुल्क परत मिळण्यास विशिष्ट प्रकरणात विद्यार्थी पात्र असेल.

ड) **<u>नाव नोंदणी अर्ज (अर्ज क्र. १७) ऑनलाईन पद्धतीने विभागीय मंडळाकडे पाठविण्याचे संदर्भात माध्यमिक शाळांसाठी सूचना</u>**

१) **अर्ज क्रमांक १७ हा खाजगी विद्यार्थी म्हणून मंडळाकडे नाव नोंदणी करावयाचा अर्ज आहे. तसेच परीक्षेचे आवेदनपत्र स्वतंत्र असते व नावनोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते स्वतंत्रपणे भरावे लागते याबाबत विद्यार्थ्यांना स्पष्ट कल्पना द्यावी.**

२) **संबंधित शाळेने ऑनलाईन/प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच upload केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती शाळेत जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करुन माहिती/कागदपत्रे अपूर्ण असल्यास सदर अर्ज “अपूर्ण” (Incomplete) याप्रकारे नोंदवून विद्यार्थ्याकडे त्रुटी पुर्ततेसाठी पाठवावयाचे आहेत. तसेच इतर परिपूर्ण अर्ज विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्रे शाळेमध्ये ठेवावयाची आहेत.**

३) **खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन/सुधारित अभ्यासक्रम लागू असून, नियमित विद्यार्थ्याप्रमाणे माध्यमिक शाळेने परीक्षेचे आवेदनपत्र, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर माध्यमिक शाळेचे नाव, index no. टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी ही मुख्याध्यापकांची राहील.**

४) आपल्या परिसरातील किमान ५० विद्यार्थी प्रवेश क्षमते अंतर्गत इ. ५ वी उत्तीर्ण झालेल्या व दिनांक ३१ जुलै रोजी वयाची १४ वर्षे पूर्ण असलेल्या तसेच आपल्या शाळेतील माजी विद्यार्थ्यांचे प्राधान्याने नाव नोंदणी अर्ज क्र. १७ स्विकारणे आपणास बंधनकारक आहे. दि. ३० जून पूर्वी विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे व १ जुलै रोजी कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेच्या हजेरीपटावर त्याचे नाव असणार नाही. मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त वाढीव ५० विद्यार्थी क्षमता वाढवून पाहिजे असल्यास विभागीय मंडळाची व राज्य मंडळ कार्यालयाची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे तसेच **<u>आपल्या परिसरातील</u>** विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्वीकारीत नाहीत अशी तक्रार प्राप्त झाल्यास त्या शाळेविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल.

५) आपल्या शाळेस विभागीय मंडळाने मंजूर केलेले विषय व माध्यमाच्या विद्यार्थांचे फॉर्म नं. १७ आपल्या शाळेतून सादर केले जातील याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

६) विभागीय मंडळाने ज्या शाळांना चालू शैक्षणिक वर्षात प्रथम मान्यता दिलेली आहे अशा शाळांनी त्यांचे स्वत:चे माजी विद्यार्थी वगळता अन्य विद्यार्थ्यांचे अर्ज क्र. १७ पुढील ३ वर्षांपर्यंत पाठविण्यात येऊ नयेत.

७) कोणत्याही खाजगी विद्यार्थ्यास तांत्रिक/व्यावसायिक गटातील विषय माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी घेता येणार नाहीत. तसेच विषय योजनेप्रमाणे (शासन निर्णय दि.०८ ऑगस्ट २०१९ नुसार) विषयांची निवड विद्यार्थ्याने केल्याची खात्री करावी. चुकीच्या विषयाची निवड (wrong combination) विद्यार्थ्याने केल्याचे निदर्शनास आल्यास व त्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची राहील.

८) नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच खाजगी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र निर्गम उताऱ्याप्रमाणे (जनरल रजिस्टरप्रमाणे) नोंदी ठेवाव्यात व आपल्या माध्यमिक शाळेमार्फत नाव नोंदणी करून परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यास माध्यमिक शाळा सोडल्याच्या दाखल्या ऐवजी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील (प्रपत्र - क ) प्रमाणपत्र द्यावे.

९) परीक्षेसाठी मंडळाकडे सादर करण्यात आलेल्या आवेदनपत्राबाबतची माहिती सर्व माध्यमिक शाळांनी सूचना फलकावर लावावी. सर्व मुख्याध्यापकांनी स्वतः लक्ष घालून सर्व संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत सविस्तर सूचना द्याव्यात.

**१०) पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह त्याच शाळेतून भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेमार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावीत.**

११) एकदा इ. १० वी परीक्षा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण तसेच तुरळक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज क्र. १७ भरता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज online मंडळाकडे सादर करू नयेत. असे अर्ज प्राप्त होऊन विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असल्याचे निदर्शनास आल्यास मंडळ विनियम ५५ नुसार कारवाई करण्यात येईल.

१२) ३०० गुणांच्या तीन भाषा विषयांचा गट उत्तीर्णतेसाठी एकत्रित असेल. या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहतील आणि त्यापैकी १०० गुणांच्या भाषा विषयामध्ये किमान २५% (म्हणजे १०० पैकी किमान २५ गुण) आणि संयुक्त भाषा विषयांच्या ५० गुणांच्या भाषा विषयात किमान २५% (म्हणजे ५० पैकी किमान १३ गुण) आवश्यक राहतील.

१३) या विद्यार्थ्यांची विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा इतर नियमित विद्यार्थ्यांसोबत घेण्यात यावी.

१४) प्रचलित पद्धतीप्रमाणे उत्तीर्णतेसाठी गणित व विज्ञान विषयांचा एकत्रित गट असेल. या दोन विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान ७० (३५%) गुण व त्यापैकी कोणत्याही एका विषयात किमान २५% गुण म्हणजे विज्ञान विषयात १०० पैकी किमान २५ आणि गणित विषयात १०० पैकी किमान २५ गुण आवश्यक असण्याची प्रचलित तरतूद कायम आहे.

१५) विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाच्या १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आहेत. लेखी परीक्षेसाठी ४०-४० गुणांच्या स्वतंत्रपणे दोन प्रश्नपत्रिका राहतील, त्यासाठी स्वतंत्रपणे २ तास राहील. उत्तीर्णतेसाठी ३५% गुणांची आवश्यकता राहील.

१६) बीजगणित व भूमिती या विषयाच्या १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण अंतर्गत मूल्यमापन परीक्षेसाठी आहेत. लेखी परीक्षेसाठी ४०-४० गुणांच्या स्वतंत्रपणे दोन प्रश्नपत्रिका राहतील, त्यासाठी स्वतंत्रपणे २ तास राहतील. उत्तीर्णतेसाठी ३५% गुणांची आवश्यकता राहील.

१७) सामाजिकशास्त्रे या विषयाच्या १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण अंतर्गत मूल्यमापन परीक्षेसाठी आहेत. लेखी परीक्षेसाठी ४० – ४० गुणांच्या स्वतंत्रपणे दोन प्रश्नपत्रिका राहतील, त्यासाठी स्वतंत्रपणे दोन तास राहतील. उत्तीर्णतेसाठी ३५% गुणांची आवश्यकता राहील.

१८)इ.१०वीच्या नियमित परीक्षेसाठी कोणताही (फॉर्म नं. १७ सहित) खाजगी विद्यार्थी शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला व क्रीडा प्रस्तावांच्या सवलतीच्या अतिरिक्त गुणांसाठी पात्र राहील. संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेमार्फत सदर प्रस्ताव विहित नमुन्यात व विहित मुदतीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीसह मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांमार्फत मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

१९)या योजनेअंतर्गत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होणारा विद्यार्थी कोणतेही बक्षीस किंवा शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असणार नाही.

२०)विद्यार्थ्याने निवड केलेल्या शाळेत जे शालेय/ वैकल्पिक विषय शिकविले जात असतील तेच विषय घेणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील. या विषयांच्या परीक्षा संबंधित शाळेने घेणे बंधनकारक राहील.

२१)विद्यार्थ्याने ज्या शाळेतून खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी केली असेल त्या शाळेस जे परीक्षा केंद्र आहे, त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे बंधनकारक राहील.

२२)सदरची योजना सन २०२४ च्या परीक्षेपासून अंमलात आली असल्याने यापूर्वी जुन्या संपर्क केंद्रामार्फत नाव नोंदणी करून परीक्षेस प्रविष्ट होऊन अनुत्तीर्ण झाले आहेत तसेच फक्त नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले, मात्र परीक्षेस प्रविष्ट न झालेल्या विद्यार्थ्यांनी त्याच जुन्या शाळेमार्फत परीक्षेची आवेदनपत्रे online पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) भरून खाजगीरीतीने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी पात्रतेच्या अटी, शुल्काचा तपशील, अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, मुख्याध्यापकांसाठी महत्त्वाच्या सूचना व इतर आवश्यक माहिती व विविध प्रपत्रे मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होतील. तसेच online नाव नोंदणी अर्ज जसे प्राप्त होतील तसे कागदपत्रांची तपासणी करून माध्यमिक शाळेने online पद्धतीने विभागीय मंडळाकडे पाठवावयाची आहेत. प्रत्यक्ष कागदपत्रे / अर्ज मंडळाकडे जमा करण्याची आवश्यकता नाही.

## शालेय श्रेणी विषय

**अनिवार्य विषय**

### १. आरोग्य व शारीरिक शिक्षण (पी १)

आरोग्य व शारीरिक शिक्षण हा शालेय श्रेणीचा अनिवार्य विषय असून या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार घटक निहाय भारांश देवून क्षमता निश्चित कराव्यात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुदृढतेवर विशेष भर द्यावा. लेखी परीक्षा घेवू नये. तथापि उपक्रमांच्या तात्विक भागांचे लेखन कार्य अपेक्षित आहे. निश्चित केलेल्या क्षमतांनुसार प्रथम सत्र व व्दितीय सत्रात स्वतंत्रपणे प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ घेवून मूल्यमापन करावे.

वार्षिक निकालपत्रक तयार करताना प्रथम सत्रातील गुण, व्दितीय सत्रातील गुण एकत्र करून सरासरीनुसार त्या गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे.

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | द्वितीय सत्र | | | एकूण | सरासरी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखन कार्य | प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ | एकूण (अ) | लेखन कार्य | प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ | एकूण (ब) | (अ+ब) | (अ+ब) / २ | |
| | | (५०) | (५०) | (१००) | (५०) | (५०) | (१००) | (२००) | (१००) | |
| | | | | | | | | | | |

### २. जलसुरक्षा (आर ८)

जलसुरक्षा हा विषय इयत्ता १० वीसाठी अनिवार्य श्रेणी विषय म्हणून निर्धारित करण्यात आलेला आहे. या विषयाची मांडणी ही पाठयपुस्तक व कार्यपुस्तिका (प्रकल्प व नोंदवही) अशा स्वरूपात करण्यात आलेली आहे. त्यानुसार पाठयपुस्तकामध्ये जलशिक्षण, जलसंधारण, जलव्यवस्थापन व जलगुणवत्ता या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. तर कार्यपुस्तिकेमध्ये चार प्रमुख घटकांवर आधारीत विद्यार्थ्याने करावयाच्या सर्व कृती, उपक्रम आणि प्रकल्पांचा समावेश आहे. त्याविषयी सूचना आणि मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. या विषयाच्या संपूर्ण अध्ययनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध कृती, उपक्रम आणि प्रकल्प यांचे मूल्यमापन करण्यासाठी पुढीलप्रमाणे मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली आहे.

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | द्वितीय सत्र | | | उपक्रम व प्रकल्प नोंद वही | एकूण | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उपक्रम | प्रकल्प | तोंडी / लेखी परीक्षा | उपक्रम | प्रकल्प | तोंडी / लेखी परीक्षा | | | |
| | | (२०) | (१५) | (१०) | (२०) | (१५) | (१०) | (१०) | (१००) | |
| | | | | | | | | | | |

उपरोक्तप्रमाणे एकूण १०० गुणांपैकी प्राप्त गुणांचे श्रेणीत रुपांतर करण्यात यावे .अ, ब, क श्रेणी उत्तीर्णता तर ड श्रेणी अनुत्तीर्णता दर्शवेल.

(अ श्रेणी– ६० गुण ते १०० गुण, ब श्रेणी- ४५ ते ५९ गुण, क श्रेणी- ३५ ते ४४ गुण, ड श्रेणी ० ते ३४ गुण )

**वैकल्पिक विषय**

१. स्काऊट गाईड **(पी २)**

२. एन सी सी **(पी ३)**

३. संरक्षणशास्त्र **(पी ४)**

४. नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा **(पी ५)**

५. समाजसेवा **(पी ६)**

६. स्व-विकास व कलारसास्वाद **(आर-७)**

उपरोक्त सहा वैकल्पिक विषयांपैकी कोणताही एक विषय निवडण्यात यावा.

१) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण या विषयांतर्गत समाविष्ट असणाऱ्या ०९ विषयांपैकी एका विषयाची निवड संबंधित शाळा स्तरावर करावयाची असून सदर विषयाची दोन्ही सत्रात प्रत्येकी ६० गुण लेखी व ४० गुण प्रात्यक्षिक परीक्षा याप्रमाणे २०० गुण व वार्षिक कामाचे प्रत्येक सत्रात २० गुणांचा प्रकल्प याप्रमाणे ४० गुण, कृतिकार्य प्रत्येक सत्रात २० गुण याप्रमाणे ४० गुण तसेच नोंदवही प्रत्येक सत्रात १० गुण याप्रमाणे २० गुण अशा प्रकारे १०० गुण याप्रमाणे लेखी + प्रात्यक्षिक + वार्षिक काम = एकूण ३०० गुणांपैकी प्राप्त गुणांचे १०० गुणात रुपांतर करुन त्याचे श्रेणीत रुपांतर करून **online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे सादर करावी.** सदर श्रेणीची नोंद विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत दर्शविण्यात येईल.

२) इ. १० वी च्या शालेय श्रेणीच्या वैकल्पिक गटातील स्व-विकास व कला रसास्वाद, समाजसेवा, स्काउट / गाइड, नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा, संरक्षण शास्त्र व एनसीसी या विषयांपैकी एक विषय निवडायचा असतो. या विषयाची परीक्षा ५० गुण लेखी व ५० गुण प्रात्यक्षिक + तोंडी अशी प्रत्येक सत्रात घेऊन मिळालेल्या २०० गुणांचे रुपांतर १०० गुणात करुन ती श्रेणी विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत दर्शविण्यात येईल.

३) परीक्षेचे आवेदनपत्र मंडळाने निर्धारित केलेल्या ठराविक मुदतीत विद्यार्थ्यांनी भरले पाहिजे. त्याविषयीच्या सूचना आपल्या शाळेमार्फत दिल्या जातील.

४) पुनर्परिक्षार्थी म्हणून खाजगी विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ट होता येईल. त्यासाठी पुढील परीक्षेचे आवेदनपत्रही यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या शाळेमार्फतच सादर करावे लागेल.

५) परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र, गुणपत्रक व प्रमाणपत्र इ. कागदपत्रे विद्यार्थ्यांना पोहोचविण्याची जबाबदारी शाळेची राहील.

- **ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत website वरील Helpline वर संपर्क साधावा.**

**इ) विभागीय मंडळ स्तरावर करावयाची कार्यवाही**

**१ विभागीय मंडळ स्तरावर खाजगी विद्यार्थ्यांचे अर्ज Maker / Checker पध्दतीने तपासावयाचे आहेत. माध्यमिक शाळांकडून प्राप्त झालेले अर्ज नेमून दिलेल्या जिल्हा/तालुका नुसार संबंधित कर्मचाऱ्याला (Desk1 user) त्यांचे Login मध्ये उपलब्ध होतील.**

**२ संबंधित कर्मचाऱ्यांनी online पध्दतीने प्राप्त अर्ज तसेच कागदपत्रांची पडताळणी करुन स्वतःच्या अभिप्रायासह पात्र/अपात्र/अपूर्ण (Eligible / Non-eligible / Incomplete) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावयाचे आहेत. वरील प्रमाणे कार्यवाही केल्यावर संबंधित कर्मचाऱ्याच्या Login मध्ये कार्यवाही पूर्ण केलेल्या अर्जांची एकत्रित यादी (pdf स्वरुपात) काढण्याची सुविधा दिलेली आहे. शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांनी त्यांच्या Login मधून प्राप्त यादीतील (pdf) सर्व नावनोंदणी अर्जांची व कागदपत्रांची पडताळणी करुन सदर यादीवर आपले अभिप्राय नोंदवावे व पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवावे, त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या सर्व अर्जांबाबत अंतिम निर्णय पात्र/अपात्र (Eligible / Non-eligible) असा शेरा ऑनलाईन पध्दतीने देऊन अर्ज निकाली काढावयाचा आहे. अर्ज पात्र केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे Enrollment Certificate तयार होऊन सर्व संबंधित घटकांस त्यांच्या Login मध्ये उपलब्ध होईल, तसेच Enrollment Certificate ची डीजीटल प्रत विद्यार्थ्यांने नोंदविलेल्या email address वर पाठविण्यात येईल.**

३ एखादा अर्ज कागदपत्रांअभावी अपात्र ठरल्यास त्या विद्यार्थ्याकडून संबंधित कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून अंतिम कार्यवाही करावी. अपात्र विद्यार्थ्यास प्रक्रिया शुल्काचे रु.१००/- वगळून उर्वरित रक्कम परत करण्यात यावी.

४ सदर प्रक्रिया ऑनलाईन असल्याने यासंदर्भातील विभागीय मंडळ स्तरावरील सर्व कामकाज विभागीय मंडळातील गणकयंत्र विभाग व खाजगी विद्यार्थी शाखा यांचेकडून समन्वयाने करुन घेण्यात यावे.

५ शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात यावा.

६ **इ. १०वी फेब्रु—मार्च २०२६ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्यास/संबंधित शाळेस त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.**

७ **एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यास प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता (Current address) माध्यम, शाळा यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.**

८ दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकीत्सकांच्या / प्राधिकृत केलेल्या **रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची/UDID Card** ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत शाळांना मार्गदर्शन करण्यात यावे.

९ **पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह त्याच शाळेतून भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेमार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्याबाबत सूचना दयावी.**

१० **ज्या माध्यमिक शाळेमधून विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्याच माध्यमिक शाळेमार्फत आवेदनपत्रा संदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्याबाबत सर्व माध्यमिक शाळांना विभागीय मंडळामार्फत सूचना देण्यात याव्यात.**

११ **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेसाठी प्रत्येक शाळेने आपल्याच शाळेतील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच नावनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादेत (५० विद्यार्थी) स्वीकारावेत. तसेच ज्या शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज स्वीकारत नाहीत अशा शाळांची तक्रार प्राप्त झाल्यास त्या शाळांविरुध्द कारवाई करण्यात येईल, असे सर्व शाळांना सूचित करावे.**

**ई) <u>या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा (इंग्रजी /मराठी), गणित, सामाजिकशास्त्रे या विषयाच्या स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिल्या जातील, त्याचा तपशील खालीलप्रमाणे -</u>**

**संकेत स्थळ - http://www.mahahsscboard.in**

| अ.क्र. | विषय | स्वाध्यायपुस्तिका संख्या |
|---|---|---|
| १) | द्वितीय भाषा (इंग्रजी / मराठी) | ०२ |
| २) | गणित भाग - १ (बीजगणित) भाग - २ (भूमिती) : | ०१ |
| ३) | इतिहास व राज्यशास्त्र | ०१ |
| ४) | भूगोल | ०१ |
| | | ०५ |

सदर स्वाध्याय पुस्तिकांच्या फक्त सरावासाठी प्रिंट काढून घेण्याबाबत तसेच खाजगी विद्यार्थ्यांची नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक व श्रेणी विषयांची परीक्षा घेऊन सदर परीक्षांचे गुण विहित मुदतीत ऑनलाइन पद्धतीने विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य असल्याबाबत तसेच नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचे सर्व रेकॉर्ड शाळेच्या दफ्तरी ठेवणेबाबत संबंधित शाळांना सूचित करावे.

विज्ञान विषयासाठी प्रात्यक्षिक परीक्षा असल्याने सदर विषयासाठी स्वाध्याय पुस्तिका राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

प्रपत्र -'अ'

कोऱ्या कागदावर सादर करावयाचा स्वसाक्षांकित प्रतिज्ञापत्राचा नमुना
(शाळा सोडल्याचा मूळ दाखला गहाळ झालेला असल्यास)

-----------------------------------------------------------------------------------------------------

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी सादर करावयाचे

प्रतिज्ञापत्र

मी संपूर्ण नाव (आडनाव प्रथम)................................................................................... (श्री/श्रीमती ........................................................................... यांचा /यांची मुलगा /मुलगी /पत्नी / वय .................. वर्षे..................... व्यवसाय, राहणार........................................................................ ...................................) सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो /देते की, मी दिनांक ..............................रोजी शाळा सोडली आहे. शाळेचे नाव :– .............................................................................

वर नमूद केलेल्या शाळेकडून मला शाळा सोडल्याचा दाखला मिळालेला होता .सदरचा दाखला फेब्रुवारी-मार्च/जून –जुलै ---------------- च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगी मिळविण्यासाठी मी सादर करू शकत नाही.

कारण------------------------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

मी कोणत्याही शाळेमध्ये वर नमूद केलेल्या तारखेनंतर नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला नाही .

वरील माहिती ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे संपूर्णरित्या खरी असून खोटी आढळून आल्यास मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

विद्यार्थ्याची / विद्यार्थीनीची स्वाक्षरी...................................................................

संपूर्ण नाव ...................................................................................................

ठिकाण व दिनांक .........................................................

सत्यापन

मी ........................................................................................................ प्रमाणित करतो / करते की वर नमूद केलेल्या परिच्छेदांमध्ये केलेली विधाने माझ्या माहिती आणि समजुतीप्रमाणे सत्य असून कोणतीही महत्वाची माहिती /बाब लपविण्यात आलेली नाही.

स्थळ : स्वाक्षरी -

दिनांक : शपथेवर लेखी जबानी देणाऱ्याचे नाव :____________________________

प्रपत्र -'ब'

१८ वर्षेपेक्षा कमी वय असलेल्या विद्यार्थ्यांचे बाबतीत त्यांचे वतीने त्यांच्या पालकाने कोऱ्या कागदावर सादर करावयाचा स्वसाक्षांकित प्रतिज्ञापत्राचा नमुना

(शाळा सोडल्याचा मूळ दाखला गहाळ झाला असल्यास)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी सादर करावयाचे

प्रतिज्ञापत्र

मी संपूर्ण नाव, (आडनाव प्रथम)........................................................................................ सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो/करते की, माझा पाल्य ......................................................................, वय ......... वर्षे ............ राहणार ..................................................................................... शाळेमध्ये दिनांक .................. पासून दिनांक .................... पर्यंत शिकत होता. त्याने/तिने दिनांक................ रोजी शाळा सोडली आहे. शाळेचे नाव :– ..........................................................................................

वर नमूद केलेल्या शाळेकडून त्याला शाळा सोडल्याचा दाखला मिळाला होता. सदरचा दाखला मार्च ......... . च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगी मिळविण्यासाठी ......................... ................................ या कारणामुळे तो / ती सादर करू शकत नाही.

त्याने /तिने कोणत्याही शाळेमध्ये वर नमूद केलेल्या तारखेनंतर नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनी म्हणून प्रवेश घेतलेला नाही.

वरील माहिती ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे संपूर्णरित्या खरी असून खोटी आढळून आल्यास मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

विद्यार्थ्यांच्या/विद्यार्थीनीच्या पालकांची स्वाक्षरी................................................

संपूर्ण नाव .........................................................................................................

ठिकाण व दिनांक .....................................

सत्यापन

मी ......................................................................................... वर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांचा त्याच्या / तिच्या वतीने प्रमाणित करतो की, विद्यार्थ्याचा / विद्यार्थीनीचा पालक वर नमूद केलेल्या परिच्छेदांमध्ये केलेली विधाने माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य असून कोणतीही महत्वाची माहिती बाब लपविण्यात आलेली नाही.

स्थळ ...................................

दिनांक .................................

स्वाक्षरी –

शपथेवर लेखी जबानी देणाऱ्याचे नाव .......................................................

# प्रपत्र—क

माध्यमिक शाळेचे नावं :————————————————————————————
Name of the Secondary School
——————————————————————————————————

माध्यमिक शाळेचा सांकेतांक क्रमांक :——————————————————————
School Index No.

युडायस क्रमांक :——————————— जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक ————————
UDISE No. General Register Entry No.

..........................................................................................................................................................................

## खाजगी उमेद्‌वारास द्यावयाचे प्रमाणपत्र

(जनरल रजिस्टर ठेवणे)

**Certificate to be given to Private Candidate**
**(Maintain a General Register)**

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांचे पूर्ण नावं<br>**Name in full of the Student** | |
| २. | आईचे नाव<br>**Mother's Name** | |
| ३. | जात व पोटजात<br>**Caste and Sub Caste** | |
| ४. | राष्ट्रीयत्व<br>**Nationality** | |
| ५. | धर्म<br>**Religion** | |
| ६. | जन्मस्थळ<br>**Place of Birth** | |
| ७. | जन्मतारीख महिना व वर्ष<br>(ख्रिस्ती शकाप्रमाणे अंकी व अक्षरी)<br>**Date of Birth, Month & Year**<br>**(In figures & words according to Christian calendar)** | |
| ८. | मातृभाषा<br>**Mother Tongue** | |
| ९. | खाजगी विद्यार्थी नोंदणी पूर्वीची शाळा<br>**Former School attended by the Private Candidate** | |
| १०. | नोंदणी केल्याची तारीख<br>**Date of Registration** | |
| ११. | इ.१०वी परीक्षा बैठक क्रमांक व उत्तीर्ण वर्ष<br>**Seat No. & Year of Passing Std.X** | |

वरील माहिति ————————————————————————— या शाळेतील जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक ———————— शाळा सोडल्याचा दाखला क्रमांक ——————— नुसार प्रमाणित करण्यात येत आहे.

**The information above is certified -------------------------------------------------------------------------- school according to the General Register No. --------------- and School Leaving Certificate No. ------------------ of --------------------------------------------------- School.**

मुख्याध्यापक,
स्वाक्षरी व शाळेचा शिक्का
**Head Master**
**Sign & Stamp of the School**

# <u>प्रपत्र - ड</u>

| माध्यमिक शाळा क्रमांक | S | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

पूर्व परवानगी शिवाय खाजगी विद्यार्थ्याचे ५० पेक्षा जास्त फॉर्म नं. १७ न पाठविण्याबाबतचे हमीपत्र

माध्यमिक शाळेस स्वत:चे माजी विद्यार्थी वगळता इतर जास्तीत जास्त ५० खाजगी विद्यार्थ्यांचे फॉर्म नं.१७ मंडळाकडे पाठविता येतात, हयाची मला जाणीव असून माझे माध्यमिक शाळेतून मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय ५० पेक्षा जास्त फॉर्म नं १७ पाठविणार नाही. जर निर्धारित संख्येपेक्षा जास्त फॉर्म नं. १७ पाठविले गेले तर ते रद्द करण्याचा अधिकार मंडळाला असल्याची मला पूर्ण जाणीव असून मंडळाचा याबाबतचा निर्णय मला मान्य राहील, करिता मी हे हमीपत्र समक्ष भरुन दिले आहे.

दिनांक:-

मुख्याध्यापक (स्वाक्षरी)
माध्यमिक शाळेचे नांव व पत्ता

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------